MHPU180007552022

निशाणी ५ वरील आदेश
(आदेश दि.२०.०६.२०२३ रोजी)

१. प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिवादींविरुध्द तूर्तातूर्त मनाई आदेश मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. मौजे बोरीभडक, ता. दौंड, येथील शेतजमीन मिळकत गट क्र. ३१७ क्षेत्र १ हे. ८५ आर. अधिक पोटखराबा ०० हे. ०७ आर., आकार ३ रुपये ३१ पैसे ही शेतजमीन मिळकत पुर्वी एकत्र हिंदु कुटूंब कर्ता म्हणुन गावचे रेकॉर्ड ऑफ राईटला ७/१२ उता-यावर वादीचे थोरले चुलते श्री. किसन लक्ष्मण म्हेत्रे यांच्या नावावर होती. त्यांनी दि. ०६.११.१९९३ रोजी मे. तहसिलदार, दौंड यांचेकडील आदेश क्र. हक्क नोंदणी/वाटप/एस आर/३३४/१९९३, दि. ०६.११.१९९३ च्या आदेशान्वये दावा मिळकतीचा अर्धा हिस्सा एक पुतण्या नामे श्री. दिपक दशरथ म्हेत्रे, अ.पा.क. आई श्रीमती रेवुबाई दशरथ म्हेत्रे यांच्या नावे केला व अर्धा हिस्सा दुसरा पुतण्या व वादीचा सावत्र भाऊ श्री. रविंद्र कुंडलिक म्हेत्रे, अ.पा.क. वडील श्री. कुंडलिक लक्ष्मण म्हेत्रे यांचे नावे केला. या वाटप आदेशाची नोंद गावचे रेकॉर्ड ऑफ राईटला ७/१२ उता-यावर फेरफार क्र. ८५८ प्रमाणे घेण्यात आलेली होती.

३. वादीचा सावत्र भाऊ श्री. रविंद्र कुंडलिक म्हेत्रे हा सज्ञान झाल्यानंतर त्याचे अ.पा.क. म्हणुन वडील श्री. कुंडलिक लक्ष्मण म्हेत्रे यांच्या नावाची ७/१२ उता-यावरील नोंद फेरफार क्र. ३७६४ अन्वये दि. २७.११.२०२० रोजी कमी करण्यात आली व श्री. रविंद्र कुंडलिक म्हेत्रे यांच्या नावावर दावा मिळकतीच्या ७/१२ उता-यावर स्वतंत्ररित्या ०० हे. ९२.५० अधिक पो.ख. ०० हे. ३.५० आर. या क्षेत्राची नोंद करण्यात आली आहे. प्रतिवादी क्र. ४ याची जोपर्यंत ७/१२ उता-याला स्वतंत्र नोंद नव्हती तोपर्यंत वादीचे माहेरपण, चोळीबांगळी हे वादीचे वडील कुंडलिक म्हेत्रे हेच करीत होते. परंतु तेव्हा प्रतिवादी क्र. ४ यांच्या नावाची नोंद शेतजमीनीच्या ७/१२ उता-यावर स्वतंत्ररित्या झाल्यानंतर तो मन मानेल तसा वागु लागला. त्याने वादीच्या माहेरपणास, तिची चोळीबांगडी करण्यासाठी नकार दिला. तसेच आईवडीलांना सांभाळण्यास, त्यांचे पालनपोषण करण्यासही नकार दिला व तो त्याच्या पत्नी व मुलाबाळांना घेऊन वेगळा राहु लागला. दावा मिकतीमध्ये वादीने तिचा असणारा १/६ हिस्सा वाटप करुन प्रतिवादी क्र. ४ कडे मागितला त्यावेळी त्यांनी वादीचा या जमीनीशी कुठलाही संबंध राहिलेला नाही. जमीन ही आता फक्त त्याच्या मालकीची आहे. जमीनीचे ते त्याच्या मर्जीप्रमाणे विल्हेवाट लाऊन टाकेन पण तिला हिस्सा देणार नाही. अशा प्रकारे दम देऊन शेतजमीन वाटुन देण्यास वादीला नकार दिला. दावा मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राईटला ७/१२ उता-याला प्रतिवादी क्र. ४ यांच्या नावाची नोंद झालेली आहे. याचा गैरफायदा घेऊन ते वादीच्या अपरोक्ष परस्पर दावा मिळकतीची विल्हेवाट लावण्याच्या, तिची विक्री करण्याच्या विचारात आहेत. असे झाल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. या सर्व कारणास्तव वादीने प्रतिवादी क्र. ४ विरुध्द त्यांच्या नावावरील दावा शेतजमीनीची खरेदीखत, गहाणखत, नोटरीदस्त, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, दानपत्र, लिज, लिन इत्यादीद्वारे अन्यथा इतर मार्गाने ति-हाईत इसमांना हस्तांतरीत करु नये. दावा मिळकतीवर कोणत्याही मार्गाने आर्थिक बोजे निर्माण करु नयेत, दावा मिळकत कोणत्याही जोडजखमेमध्ये गुंतऊ नये याकरीता तुर्तातूर्त मनाई आदेश व्हावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

४. प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ यांना दाव्याच्या समन्सची बजावणी झाल्यानंतर त्यांनी नि. १४ नुसार पुरसीस देऊन वादीचा दावा मान्य व कबुल आहे असे कळविले आहे. प्रतिवादी क्र. ४ यांना समन्सची बजावणी झाल्यानंतर ते दाव्यात हजर झाले. परंतु मुदतीत त्यांची कैफियत व जबाब दाखल न केल्यामुळे त्यांच्याविरुध्द विनाकैफियतीचा आदेश दि. २९.०८.२०२२ रोजी झालेला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. ४ यांनी नि. २१ अन्वये त्यांच्याविरुध्द झालेला विनाकैफियतीचा आदेश सेट असाईड करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळावी असा अर्ज दाखल केला होता. तो अर्ज गुणदोषावर निकाली काढुन खर्च लादुन मंजुर केलेला आहे.

५. प्रतिवादी क्र. ४ यांची कैफियत व जबाब नि. २३ अन्वये दाखल आहे. त्यांनी वादीची कथने नाकारली आहेत. त्यांचे असे कथन आहे की, दावा दाखल करण्यास वादीस कोणतेही खरे व बरोबर व कायदेशीर कारण घडलेले नाही. दावा मिळकतीप्रमाणे सदर मिळकतीचे ७/१२ वरील सर्व हक्कदारांना म्हणजेच दिपक दशरथ म्हेत्रे यांना आवश्यक पक्षकार सामील करणे आवश्यक होते. सर्व संबंधीतांना दाव्याच्या कामी सामील न केल्यामुळे दाव्यास नॉन जॉईंडर ऑफ नेसेसरी पार्टीज या तत्वाची बाधा येत असल्याने दावा मेंटेनेबल नसल्याने तो सरळ फेटाळण्यालायक आहे. वादीला दावा मिळकतीमधुन कायदेशीर वाटप मागण्याचा कोणताही हक्क व अधिकार नसल्याने दावा फेटाळण्यात यावा. दावा मिळकत ही वादीचे वडीलोपार्जित मालकी हक्काची नसुन प्रतिवादी क्र. ४ च्या एकट्याच्या मालकी हक्काची असल्यामुळे वादीस दावा मिळकतीतुन वाटप मागण्याचा कायदेशीर हक्क नव्हता व नाही. दावा मिळकत ही सर्वांच्या संमतीने सन १९९३ मध्ये प्रतिवादी क्र. ४ च्या नावे झालेली असल्याने दाव्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येत आहे. वादी ही प्रतिवादी क्र. १ यांची कायदेशीर वारस नसल्यामुळे त्यांना दावा मिळकतीमधुन वाट मागण्याचा कायदेशीर हक्क मागता येत नाही. दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे असुन दावा मिळकतीमधुन सहहिस्सेदार दिपक म्हेत्रे व प्रतिवादी क्र. ४ यांच्यामध्ये कायदेशीर वाटप झाले आहे व दावा मिळतीचा फाळणीबारा झालेला नसल्यामुळे वादीला दावा मिळकतीतुन प्रतिवादी क्र. ४ विरुध्द वाटप मागण्याचा कायदेशीर हक्क व अधिकार नाही. दाव्यातील प्रतिवादी क्र. ४ यांची आई कुसूमबाई कुंडलिक म्हेत्रे (प्रतिवादी क्र. ३) ही प्रतिवादी क्र. १ ची कायदेशीर लग्नाची पहिली पत्नी आहे व वादी यांची आई प्रतिवादी क्र. २ अंजनाबाई कुंडलिक म्हेत्रे ही प्रतिवादी क्र. १ यांची कायदेशीर पत्नी नसल्यामुळे वादी ही प्रतिवादी क्र. १ ची कायदेशीर वारस नाही. त्यामुळे दाव्यातील कलम ४ मधील दिलेला वंशवेल खरा व बरोबर नसुन तो प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही. दाव्यात दिलेले नातेसंबंध चुकीचे आहे. वादीचे लग्न दि. ०७.०३.१९८८ साली झालेले असुन वादीच्या लग्नाच्या वेळी प्रतिवादी यांनी संपुर्ण खर्च करुन वादीची चोळी बांगडी करुन माहेरपणाचा संपुर्ण खर्च केलेला होता व करीत आहे. त्यामुळे तिला वाटप मागण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही.

६. त्यांचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकत ही मुळची प्रतिवादी क्र. ४ यांचे चुलते किसन लक्ष्मण म्हेत्रे यांच्या मालकीची होती. दावा मिळतीपैकी ८ आणे हिश्याचे क्षेत्र म्हणजेच ०० हे. ९२.५० आर. अधिक पोटखराबा ०० हे. ३.५० आर. एकुण क्षेत्र ०० हे. ९६ आर. हे प्रतिवादी क्र. ४ यांनी सन १९९३ मध्ये र.रु. ९५,०००/- देऊन खरेदी केलेले होते व आहे. परंतु प्रतिवादी क्र. ४ यांची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्यामुळे त्यांनी योग्य तो स्टॅम्प फी करुन खरेदी करुन घेणे शक्य नव्हते. त्यामुळे सन १९९३ मध्ये त्यांचे चुलते यांनी मे. तहसिलदार, दौंड यांच्याकडील वाटपाने प्रतिवादी क्र. ४ यांच्या नावाने केलेली होती व आहे. सदरची मिळकत दिपक दशरथ म्हेत्रे व प्रतिवादी क्र. ४ यांच्या नावाने वाटपाने केली. त्याप्रमाणे गावी फेरफार क्र. ८५८ अन्वये त्या दोघांची नावे समान हिश्याने मिळकतीला लागली. तेव्हापासुन प्रतिवादी क्र. ४ यांचे ताबेवहिवाटीस होती व आहे. प्रतिवादी क्र. ४ हे दावा मिळकत वहिवाटुन ऊस, ज्वारी, बाजरी, मका, गहु, कांदा इत्यादी पिके घेत होते व आहे. दावा मिळकत ही वडीलोपार्जित मिळकत नव्हती. ती प्रतिवादी यांच्या स्वकष्टर्जित मालकी हक्काची असुन त्याच्याशी वादी अगर अन्य प्रतिवादींचा कोणताही हित व हक्क संबंध नव्हता. केवळ सद्यस्थितीत जमीनीचे भाव वाढल्याने वादी यांनी लालसेपोटी जमीन फुकटांत बळकाविण्याच्या दुष्ट हेतुन काल्पनिक घटनाक्रम नमुद करुन खोटा दावा दाखल केला आहे. वादीने प्रतिवादीविरुध्द त्यांना त्रास देऊन खोटेनाटे आरोप करुन दावा मिळकत बळकाविण्याकरीता खोटा कांगावा करुन कुटील डाव रचुन खोटा व लबाडीचा दावा व अर्ज आणलेला आहे. वादी वाटप मिळण्यास पात्र नाही. वादींना प्रथमदर्शनी केस तर नाहीच परंतु न्यायाचा समतोल प्रतिवादींच्या बाजुने आहे. या सर्व कारणास्तव त्यांनी दावा व मनाई अर्ज फेटाळण्यात येऊन वादीकडुन प्रतिवादी क्र. ४ यांना र.रु. १०,०००/- कम्पेन्सेटरी कॉस्ट मिळावी अशी विनंती केली आहे.

७. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एस.जी.देशमुख व प्रतिवादी क्र. ४ तर्फे विधीज्ञ श्री. एस.एस.गावडे यांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला.

८. वादी व प्रतिवादींचे कथन विचारात घेता खालील प्रश्न निर्माण होतात. त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा येणेप्रमाणेः-

| अ.क्र. | प्रश्न | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी प्रकरण वादीच्या बाजुने आहे काय? | - | होय. |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय? | - | होय. |
| ३. | अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे भविष्यात न भरुन निघणारे नुकसान होईल असे वादी सिद्ध करतात काय? | - | होय. |
| ४. | आदेश काय? | - | अंतिम आदेशाप्रमाणे |

का र ण मि मां सा

९. वादीने तिच्या कथनाप्रित्यर्थ दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दि. १५.०२.२०२२, श्री. रविंद्र कुंडलिक म्हेत्रे यांचा ८अ उतारा दि. १५.०२.२०२२, दावा मिळकतीचा पुर्वीचा कब्जेदार म्हणुन श्री. किसन म्हेत्रे यांच्या नावाची नोंद असलेला ७/१२ उतारा, दावा मिळकतीचा तहसिलदार, दौंड यांचे आदेशाने वाटप झाल्याचा फेरफार क्र. ८५८ चा उतारा, फेरफार क्र. ८५८ मधील श्री. रविंद्र म्हेत्रे अ.पा.क. वडील कुंडलिक म्हेत्रे हा शेरा कमी करुन शेतजमीनीवर श्री. रविंद्र म्हेत्रे यांच्या नावाची नोंद झाल्याचा फेरफार क्र. ३७६४ चा उतारा, वादीचा शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रत व फेरफार क्र. ८५८ प्रमाणे ७/१२ उता-यावर नोंदी झाल्याचा दावा मिळकतीचा ७/१२ उतारा इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

दोन्ही पक्षांना मान्य असलेली परिस्थितीः-

१०. वादी ही प्रतिवादी क्र. १ व २ यांची मुलगी आहे. प्रतिवादी क्र. ४ हा प्रतिवादी क्र. १ व ३ चा मुलगा तसेच प्रतिवादी क्र. ५ ही प्रतिवादी क्र. १ व ३ ची मुलगी आहे. वादी ही प्रतिवादी क्र. ४ ची सावत्र बहीण आहे. दावा मिळकत गट क्र. ३१७ हा पुर्वी किसन लक्ष्मण म्हेत्रे यांच्या मालकीची होती. फेरफार क्र. ८५८ नुसार तहसिलदार, दौंड यांचेकडील आदेश क्र. हक्कनोंदणी/वाटप/एस आर/३३४/९३ दौंड दि. ०६.११.१९९३ नुसार गट क्र. ३१७ मधील १ हे. ८५ आर. अधिक पो.ख. ०० हे. ७ आर. हे दिपक दशरथ म्हेत्रे अ.पा.क. आई रेऊबाई दशरथ म्हेत्रे व प्रतिवादी क्र. ४ अ.पा.क. कुंडलिक लक्ष्मण म्हेत्रे या दोन्हींची नावे कब्जेदार सदरी प्रत्येकी ८ आणे हिश्याच्या पाण्याच्या हक्कासह नोंद करण्यात आली. ती नोंद दि. २१.०५.१९९४ रोजी प्रमाणित झालेली आहे. प्रतिवादी क्र. ४ हे सज्ञान झाल्यानंतर फेरफार क्र. ३७६४ नुसार गट क्र. ३१७ वरील अ.पा.क. कुंडलिक म्हेत्रे यांचा शेरा कमी झालेला आहे. त्याची नोंद दि. २७.११.२०२० रोजी प्रमाणित झाली. त्यानंतर गट क्र. ३१७ वर प्रतिवादी क्र. ४ व दिपक दशरथ म्हेत्रे यांच्या नावे प्रत्येकी ०० हे. ९२.५० आर. अधिक पो.ख. ०० हे. ३.५० आर. क्षेत्राची नोंद झालेली आहे. दावा मिळकतीवर प्रतिवादी क्र. ४ यांचा ताबा आहे. याबाबी वादातीत नाही.

प्रश्न क्र. १ ते ३ करिताः-

११. तीन्ही प्रश्न एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करीत आहे. दोन्ही पक्षांना मान्य परिस्थिती पाहता वादीने दावा मिळकत वडीलोपार्जित आहे. वादी ही प्रतिवादी क्र. १ ची पहिल्या पत्नीपासुन झालेली मुलगी आहे. तिचा दावा मिळकतीमध्ये १/६ हिस्सा आहे. अशी वादीची कथने आहेत. यास प्रतिवादी क्र. ४ यांनी नाकारलेले आहे. दावा मिळकत ही वडीलोपार्जित आहे किंवा नाही तसेच वादी ही प्रतिवादी क्र. १ ची पहिल्या पत्नीपासुन झालेली मुलगी आहे किंवा नाही, वादींचा दावा मिळकतीमध्ये हिस्सा आहे किंवा नाही या बाबी दोन्ही पक्षाचा पुरावा आल्यानंतर ठरविता येईल. प्रतिवादीचा दावा मिळकतीवर मालकी हक्क व कब्जेवहिवाटा आहे हे वादींनी दाखल केलेले ७/१२ उतारे, फेरफार क्र. ८५८, ३७६४ वरुन स्पष्ट दिसुन येते. प्रतिवादी

क्र. ४ यांनी दावा मिळकत ति-हाईत इसमांना विकण्याच्या तयारीत असल्याचे अगर दावा मिळकतीवर बोजे निर्माण करण्याच्या तयारीत असल्याबाबत कोणतीही कागदपत्रे वादीने दाखल केलेली नाहीत. वादी व प्रतिवादीचे चुलते किसन लक्ष्मण म्हेत्रे हे दावा मिळकतीचे मुळ मालक असल्याचे नि. ३/३ वरील ७/१२ उता-यावरुन दिसुन येते. त्यानंतर फेरफार क्र. ८५८ नुसार प्रतिवादी क्र. ४ दिपक दशरथ म्हेत्रे हे अज्ञान असतांना त्यांच्या नावे प्रत्येकी ८ आणे हिस्सा तहसिलदार, दौंड यांच्या आदेशानुसार वाटपाने आलेली आहे. प्रतिवादी क्र. ४ यांनी सज्ञान झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ चे नाव अ.पा.क. म्हणुन कमी करण्यासाठी अर्ज दिला. फेरफार क्र. ३७६४ नुसार प्रतिवादी क्र. १ चे नाव दावा मिळकतीवरुन कमी झाले व प्रतिवादी क्र. ४ व दिपक दशरथ म्हेत्रे यांच्या नावे प्रत्येकी ०० हे. ९२.५० अधिक ०० हे. ३.५० आर. एकुण ९६ आर. इतके क्षेत्राची नोंद नि.३/१ वरील ७/१२ नुसार झालेली आहे. प्रतिवादी क्र. १ मालक व कब्जेदार असल्याचे त्यावरुन दिसुन येते. प्रतिवादी क्र. १ यांना त्यांचे वडीलांकडुन आलेल्या मिळकतीसंदर्भात अगर गट क्र. ३१७ ही प्रतिवादी क्र. १ यांना त्यांचे वाडवडीलांकडुन आल्यासंबंधी कोणतीही कागदपत्रे वादीतर्फे दाखल करण्यात आलेली नाही. परंतु वादीची कथने प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी नाकारलेली नाही. दाव्याचे स्वरुप पाहता व वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचे नातेसंबंध पाहता दावा मिळकतीची विक्री, खरेदी, गहाण, दान अन्य दस्ताद्वारे ति-हाईतांना हस्तांतरीत झाल्यास वादीच्या न्यायहक्कावर गदा येईल व दाव्यामध्ये गुंतागूंत वाढेल ही शक्यता नाकारता येत नाही. तसेच प्रथमदर्शनी केस सिध्द होत आहे. त्यामुळे न्यायाचा तौलनिक तराजु हादेखील वादीच्या बाजुने आहे. अशा परिस्थितीत वादीच्या लाभात तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे मोठे अपरिमित नुकसान होईल. याउलट तुर्तातूर्त मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही, तसेच त्यांच्या हक्क व अधिकाराला कोणतीही बाधा उत्पन्न होणार नाही. त्यामुळे मी वरील विवेचन व कारणांवरुन प्रश्न क्र. १ ते ३ चे निष्कर्ष 'होय' नोंदवित आहे.

प्रश्न क्र. ४ करिता:-

१२. प्रश्न क्र. १ ते ३ वर नोंदविलेल्या निष्कर्षाच्या अनुषंगाने वादीने प्रथमदर्शनी केस तसेच सोयीचा कल वादीच्या बाजुने असल्याचे दाखवुन दिलेले आहे. प्रस्तुत अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही याउलट वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. वादी व प्रतिवादींनी नमुद केलेले मुद्दे हे दोन्ही पक्षांनी आपापला पुरावा दिल्यानंतर अंतिम निकालाच्या वेळी सिध्द होईल. त्यामुळे प्रश्न क्र. ४ च्या निष्कषार्थ मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१. वादीचा नि.क्र.५ चा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. ४ यांनी स्वतः अगर इतरांमार्फत दावा मिळकत ही खरेदीखत, गहाणखत, नोटरीदस्त, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, दानपत्र, लिज, लिन इत्यादीद्वारे अन्यथा इतर मार्गाने ति-हाईत इसमांना हस्तांतरीत करु नये. दावा मिळकतीवर कोणत्याही मार्गाने आर्थिक बोजे निर्माण करु नयेत, दावा मिळकत कोणत्याही जोडजखमेमध्ये गुंतऊ नये असा प्रतिवादी क्र. ४ च्या विरुध्द तुर्तातूर्त मनाई हुकूम दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत देण्यात येतो.

३. खर्चाबाबतचे आदेश निकालाधीन.

JYOTI BHARAT GOYAL
Digitally signed by JYOTI BHARAT GOYAL
Date: 2023.06.20 17:38:14 +0530

दौंड
दि.२०.०६.२०२३

[ श्रीमती. जे.एस.खेडकर-गोयल ]
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दौंड
ता.दौंड, जि. पुणे

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file of Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | P. D. Jagatap |
| Court | :- | Smt. J.S.Khedkar-Goyal<br>C.J.J.D. & J.M.F.C. (Court No. 01),<br>Tal. Daund, Dist. Pune. |
| Order Date | :- | 20/06/2023 |
| Order singed by the<br>Presiding Officer on | :- | 20/06/2023 |
| Order uploaded on | :- | 20/06/2023 |